लोकमत

Lokmat

Printed from Lokmat epaper, Published on Thursday, June 12, 2014, Lokmat Goa Page No. 2

A A A << Back to Headlines Next >>

# मराठीसाठी अध्यासन स्थापण्याचा विद्यापीठाचा प्रस्ताव

पणजी : मराठीसाठी अध्यासन स्थापन करण्याचा प्रस्ताव गोवा विद्यापीठाने सरकारसमोर ठेवला आहे. मराठीतील विद्वानांना गोव्यात आणता येईल व त्याचा विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांनाही फायदा होईल. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सतीश शेट्ये यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी मानद संचालिका मारिया कुटो, विद्यापीठाचे निबंधक विजयेंद्र कामत, संघटक रामराव वाघ उपस्थित होते.

गोवा विद्यापीठात संशोधनासाठी वेगवेगळी सहा अध्यासने सध्या कार्यरत आहेत. डी. डी. कोसंबी अध्यासनाच्या माध्यमातून प्रख्यात इतिहासकार रोमिला थापर 'पुरातन भारताचा इतिहास' या विषयावर मार्गदर्शन करतील. पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ शिक्षक तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत दयानंद बांदोडकर अध्यासनावरून अर्थतज्ज्ञ प्रा. अमित भादुरी या शिक्षक तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

कविवर्य बा.भ. बोरकर तुलनात्मक साहित्य अध्यासनावरून डॉ. अरुणा ढेरे या 'संत कवी आणि कवयित्री' या विषयावर मार्गदर्शन करतील. प्रख्यात कवी तथा संगीतकार जीत थाईल हे 'पफरेर्मन्स पोयट्री'वर मार्गदर्शन करतील.

प्रख्यात व्यंगचित्रकार दिवंगत मारियो मिरांडा अध्यासनावरून आघाडीचे ग्राफिक आर्टिस्ट ओरिजित सेन, आघाडीच्या ग्राफिक आर्टिस्ट शेबा छाची, कोलंबिया विद्यापीठाच्या प्रा. विद्या दहेजा मार्गदर्शन करतील. संगीतकार दिवंगत अँन्थनी गोन्साल्विस अध्यासनावर स्पेनमधील सिविले विद्यापीठाचे संगीत विषयाचे प्राध्यापक सांतियागो लुसार्डी गिरेल, मार्क ट्रप तर प्रख्यात भजनी कलाकार नाना शिरगांवकर यांच्या नावाने स्थापन केलेल्या अध्यासनावरून भारतीय संगीत या विषयावरील अध्यासनावर प्रख्यात शास्त्रीय गायिका श्रीमती शोभा मुदगल व उस्ताद बहाउद्दिन डागर मार्गदर्शन करणार आहेत. यंदाचे अध्यासनाचे दुसरे वर्ष आहे.

पदव्युत्तर अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी किमान १५ व्याख्यानांना हजेरी लावल्यास त्यांना एक क्रेडिट देण्यात येईल. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ८० क्रेडिटबरोबर हे एक क्रेडिटही गृहीत धरले जाईल. या व्याख्यानांसाठी विद्यापीठबाह्य व्यक्तीही उपस्थिती लावू शकतात. १५ व्याख्यानांना हजेरी लावणाऱ्यास प्रमाणपत्र दिले जाईल.

गेल्या शैक्षणिक वर्षात दिल्लीचे नामवंत ग्राफिक आर्टिस्ट ओरिजित सेन यांनी म्हापसा मार्केटचे मॅपिंग केले. विद्यार्थ्यांनी म्हापसा मार्केट ब्लॉगही तयार केला. ही एक मोठी उपलब्धी होती, असे मारिया कुटो म्हणाल्या. डॉ. माधव गाडगीळ यांनी गोव्याच्या गेल्या पन्नास वर्षांच्या पर्यावरणावर पुस्तक लिहिण्याचे काम सुरू केले आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी मनमोकळेपणे ते संवाद साधण्याची संधी मिळाली. स्पेनमधील सिविले विद्यापीठाचे प्राध्यापक तथा पाश्चात्य संगीततज्ज्ञ सांतियागो गिरेली यांनी गतवर्षी विद्यापीठातील

विद्यार्थ्यांना संगीताचे धडे देऊन 'कॉयर ग्रुप' तयार केला. तीन ठिकाणी त्यांनी खुले कार्यक्रमही केले. पाश्चिमात्य राष्ट्रांचा इतिहास त्यांनी संगीतामधून सांगितला. गिरेली यांनी भारतीय संगीतकारांशीही चर्चा केली. (प्रतिनिधी)

---

<< Back to Headlines Next >> A A A